# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ १०६६० /२०१८ पुणे शहर, दिनांक १०.१०.२०१८

**विषय :- नवरात्र उत्सव : २०१८ निमीत्त श्री.महालक्ष्मी मंदिर, सारसबाग भागातील वाहतूक व्यवस्थेत करण्यात येणा-या बदला बाबत.**

--------००-------

दिनांक १०.१०.२०१८ रोजीपासून श्री. महालक्ष्मी मंदीर,धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट सारसबाग पुणे तर्फे सार्वजनिक नवरात्र महोत्सव साजरा करण्यात येत असून दिनांक- ११.१०.२०१८ रोजी, सकाळी ०६.३० ते ०८.०० या वेळेत शालेय विद्यार्थ्यांचे एकत्रित श्रीसुक्त/अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम आयोजीत केला असल्याने सदर कार्यक्रम दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, तेजस्वी सातपुते,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक- ११.१०.२०१८ रोजी, सकाळी ०६.३० ते श्रीसुक्त/अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपे पर्यंत खालील वाहतुकीस बंद रस्ते बाबत आदेश निर्गमित करीत आहे.

१. बाजीरावरोड वरील जमनलाल बजाज पुतळा ते सावरकर चौक या मार्गावरील वाहतुक बंद करण्यात येत आहे. जेधे चौकाकडून येणारी वाहतुक जमनालाल बजाज पुतळा येथून पुरम चौकाकडे वळविण्यात येईल.

२. मित्रमंडळ चौकाकडून येणारी वाहतुक सावरकर चौकापासून पुरम चौकाकडे बंद करण्यात येईल. सदर मार्गावरील वाहनांना सिंहगड रोड जंक्शन चौकाकडे वळविण्यात येईल. सिंहगड रोड मार्गे येणा-या वाहनचालकांनी मित्रमंडळ चौक मार्गे व्होल्गा चौकातून इच्छित ठिकाणी जाणे.

तरी नागरीकांनी व वाहन चालकांनी वरील नमूद निर्बंध केलेल्या मार्गांवर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गांचा वापर करुन पोलीसांना सहकार्य करावे.